

WELCOME



Subject :- Economy ( अर्थशास्त्र )

By
Dr. Pandit Mule
Dept. of Economy
Kalikadevi College, Shirur (ka.)Dist.Beed


**संपूर्ण लवचिकता :** वस्तूच्या किंमतीत अल्पसा बदल झाला असता मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण जेव्हा अगणिक असते तेव्हा ती संपूर्ण लवचिकता असते. अशा लवचिकतेचा वक्र OX अक्षाला समांतर असते. शिवाय अशा प्रकारच्या लवचिकतेचे उदाहरण व्यवहारात सहज पाहावयास मिळत नाही.




**(आकृती क्र. २.८)**

आकृतीत OX अक्षावर वस्तूची मागणी व OY अक्षावर किंमत मोजली आहे. OD ह्या किंमतीला असलेली मागणीअगणिक (CC) आहे, त्यामुळेOD हा मागणी वक्र OX अक्षाला समांतर आहे.अशा वस्तूची किंमत अल्पशी वाढली असता मागणी शून्य होते. हे ह्या मागणी वक्रावरून लक्षात येते.

**संपूर्ण अलवचिकता :** वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाला (वाढ किंवा घट) वस्तूची मागणी जेव्हा कसलाच प्रतिसाद देत नाही (घट किंवा वाढ) म्हणजेच भिन्न किंमतीला वस्तूची मागणी जेव्हा तीच (स्थिर) असते तेव्हा अशा मागणीस संपूर्ण अलवचिकता म्हणतात. उदा. वस्तूची किंमत 20% बदलली (घट किंवा वाढ) तरी मागणीत मात्र कसलाच बदल होत नाही.उलट मागणी तीच राहते. अशा मागणीच्या लवचिकतेचा वक्र OY अक्षाला समांतर असतो.पण अशा लवचिकतेला फारसा व्यावहारिक अर्थ नाही. वरील दोन्ही लवचिकतेचे प्रकार अव्यावहारिक असून फक्त तात्त्विक आहेत.




(आकृती क्रमांक २.९)

वरील आकृतीत वस्तूची किंमत OP असताना मागणी OM असते हे A बिंदूने दाखविले आहे. त्याच वस्तूची किंमत OP पासून $OP_1$ पर्यंत कमी कमी झाली तरी मागणी OM असते हे B बिंदूने दाखविले आहे, तसेच त्या वस्तूची किंमत $OP_2$ पर्यंत वाढली तरीही मागणी तीच म्हणजे OM असते हे C बिंदूने दाखविले आहे. अशाप्रकारे वस्तूच्या किंमतीत कसलाही बदल झाला असता मागणी मात्र तीच राहते. हे A,B,C ह्या बिंदूवरून लक्षात येते. हे भिन्न बिंदू एकाच वक्राच्या साह्याने जोडले असता MD हा मागणीवक्र मिळतो, जो OY अक्षाला समांतर आहे.

## मागणीच्या लवचिकतेचे मापन (Measurement of elasticity of demand)

लवचिकता मोजण्याच्या प्रमुख तीन पद्धती आहेत. (१) प्रमाण पद्धत (२) उत्पन्न (खर्च) पद्धत (३) भौमितिक पद्धत.

म्हणतात. ह्या पद्धतीत मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण व किंमतीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण यांचा एकत्र विचार केलेला असतो. सूत्ररूपाने ही मांडणी खालीलप्रकारे केली जाते.

$$\text{लवचिकता} = \frac{\text{मागणीतील बदलाचे प्रमाण}}{\text{किंमतीतील बदलाचे प्रमाण}} \text{ किंवा } \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

$$\text{मागणीतील बदलाचे प्रमाण} = \frac{\text{मागणीतील बदल}}{\text{पूर्वीची मागणी}} = \frac{\Delta D}{D}$$

$$\text{किंमतीतील बदलाचे प्रमाण} = \frac{\text{किंमतीतील बदल}}{\text{पूर्वीची किंमत}} = \frac{\Delta P}{P}$$

$$\text{लवचिकता} = \frac{\text{मागणीतील बदल}}{\text{पूर्वीची मागणी}} \div \frac{\text{किंमतीतील बदल}}{\text{पूर्वीची किंमत}}$$

$$= \frac{\Delta D}{D} \div \frac{\Delta P}{P}$$

$$= \frac{\Delta D}{D} \times \frac{P}{\Delta P}$$

$$= \frac{P}{D} \times \frac{\Delta D}{\Delta P}$$

ह्या पद्धतीला एकूण उत्पन्न किंवा एकूण खर्चाची पद्धती असे म्हणतात. कारण उत्पादकाच्या दृष्टीने पाहाता उपभोक्त्याने वस्तूच्या खरेदीवर खर्च केलेले उत्पन्न हे उत्पादकाचे उत्पन्न असते, तर तोच उपभोक्त्याच्या दृष्टीने खर्च असतो. थोडक्यात एकाचा खर्च दुसऱ्याचे उत्पन्न तर एकाचे उत्पन्न दुसऱ्याचा खर्च असतो. त्यामुळे एकूण उत्पन्न= एकूण खर्च असतो. खर्चाच्या पद्धतीने लवचिकता मोजताना उपभोक्त्याच्या एकूण खर्चात काय आणि कसा बदल होतो तो लक्षात घेतला जातो. व त्यावरून लवचिकता निश्चित केली जाते. खालील तक्त्यात विविध किमती व त्या किंमतीला असलेली मागणी व त्यानुसार उपभोक्त्याचा असलेला एकूण खर्च (उत्पन्न) दर्शविला आहे व त्यावरून लवचिकता ठरविली आहे. लवचिकता ठरविण्याचा सर्वसाधारण नियम असा की-

| (i) | **किंमत (रु)** | **मागणी (नग)** | **एकूण खर्च (रु)** |
|---|---|---|---|
| | 6 | 100 | 600 |
| | 5 | 120 | 600 |
| | 4 | 150 | 600 |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलानुसार मागणीत बदल होत आहे पण उपभोक्त्याच्या एकूण खर्चात मात्र कसलाच बदल होत नाही, तो स्थिर असतो तेव्हा लवचिकता = 1असते.

## लवचिकता निर्धारित करणारे प्रमुख घटक

लवचिकतेवर परिणाम करणाऱ्या किंवा ती निर्धारित करणाऱ्या घटकात प्रामुख्याने खालील घटकांचा उल्लेख करता येईल.

(१) वस्तूचे स्वरूप (२) वस्तूचे भिन्न उपयोग (३) वस्तूचा टिकाऊपणा (४) वस्तूवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण (५) किंमत पातळी (६) सवयी व प्रथा

**(१) वस्तूंचे स्वरूप :** यातील पहिल्या घटकाचा विचार करता हे स्पष्ट होते की, वस्तू ह्या भिन्न स्वरूपाच्या असतात. प्रामुख्याने वस्तू ह्या (i) आवश्यक (ii) सुखद व (iii) चैनीच्या प्रकारात मोडतात. वस्तू जर आवश्यक प्रकारातील असेल तर तिची मागणी अलवचिक असते. याउलट वस्तू ह्या सुखद किंवा चैनीच्या असतील तर त्यांची मागणी लवचिक असते.

**(२) वस्तूंचे भिन्न उपयोग :** व्यवहारातील अनेक वस्तू अशा असतात की, त्यांचे भिन्न उपयोग असतात. उदा. वीज, कोळसा, दूध वगैरे. ह्या वस्तू भिन्न गरजांच्या उपयोगासाठी उपयोगात आणल्या जातात. उदा. दुधाचा उपयोग चहासाठी होतो तसाच त्याचा उपयोग पिण्यासाठी व भिन्न गोड पदार्थ तयार करण्यासाठी होत असतो. अशा भिन्न उपयोगाच्या वस्तूची मागणी लवचिक असते.

**(३) वस्तूचा टिकाऊपणा :** उपभोगासाठी वापरल्या जाणाऱ्या ज्या वस्तू असतात त्या टिकाऊपणात भिन्न असतात. काही वस्तू ह्या अल्पकाल टिकणाऱ्या तर काही दीर्घकाल टिकणाऱ्या असतात. उदा. फुले, फळे, अंडी, दूध, धान्य ह्या वस्तू अल्पकाल टिकतात तर रेडियो, फॅन, फ्रिज कपाट ह्यांसारख्या वस्तू दीर्घकाल टिकतात. त्यामुळे अशा वस्तूंची लवचिकता भिन्न असते. अल्पकाल टिकणाऱ्या वस्तूची मागणी अलवचिक किंवा एकपेक्षा कमी असते तर दीर्घकाल टिकणाऱ्या वस्तूंची मागणी लवचिक असते.

**(४) खर्चाचे प्रमाण :** उपभोक्ता ज्या वस्तूची खरेदी करतो त्या वस्तूवर आपल्या उत्पन्नाचा किती हिस्सा (प्रमाण) खर्च करतो, हा सुध्दा लवचिकता निर्धारणात महत्त्वाचा घटक असतो.जर उपभोक्ता आपल्या उत्पन्नातील अत्यंत अल्प प्रमाण वस्तूच्या खरेदीवर खर्च करीत असेल तर त्या वस्तूची मागणी अलवचिक असते. याउलट उत्पन्नातील होणारा खर्च अधिक असेल तर मात्र त्या वस्तूची मागणी लवचिक असते.

## लवचिकतेच्या संकल्पनेचे महत्त्व (Application)

अर्थशास्त्राच्या आधुनिक सिद्धांतात मागणीच्या लवचिकतेची संकल्पना महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. आर्थिक धोरण ठरविताना सरकारला ह्या संकल्पनेचा उपयोग होतो. याशिवाय व्यापारी, उत्पादक, उपभोक्ते, बँका ह्या सर्वांना तिचा उपयोग होतो. त्यामुळे तिचे अर्थशास्त्रातील महत्त्व लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**(१) उत्पादन सिध्दान्तातील महत्त्व :** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत किंवा मुक्त अर्थव्यवस्थेतील उत्पादन हे उपभोक्त्याच्या मागणीने नियोजित केलेले असते. उत्पादकांना नफा मिळवावयाचा असेल तर त्यांना त्यांचे उत्पादन मागणीशी जुळवून घेणारे असले पाहिजे. उपभोक्त्याची वस्तूची ही मागणी उत्पादकाच्या उत्पादनावरच परिणाम करणारी नसते तर ती उत्पादकाचे उत्पादन नियंत्रित करते. शिवाय ती उत्पादन घटकाच्या मागणीवरही परिणाम करते व त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या विभाजनावर होतो.

**(२) मूल्य सिध्दान्तातील महत्त्व :** प्रत्येक उत्पादकाला त्याच्या वस्तूच्या मागणीचा विचार करणे आवश्यक असते व ही मागणी वस्तूच्या किंमतीवर अवलंबून असते. म्हणजेच किंमतीचा मागणीवर परिणाम होत असतो. अशा परिस्थितीत विक्रेत्याला वस्तूच्या मागणीचा विचार करताना वस्तूच्या मागणीच्या लवचिकतेचा विचार करणे आवश्यक ठरते. पूर्ण स्पर्धेच्या बाजारात वस्तूंची मागणी संपूर्ण लवचिक गृहिते धरली जाते, इतर बाजारपेठेत मात्र ती तशी नसते. त्यामुळे मक्तेदारी व पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत लवचिकता भिन्न असल्यामुळे तिचे महत्त्व त्या बाजारपेठेत अधिक असते.

**(३) विभाजन सिध्दान्तातील महत्त्व :** मागणीच्या लवचिकतेच्या संकल्पनेचे महत्त्व फक्त उत्पादकाला वस्तूंच्या किंमती निर्धारित करण्यापुरतेच नाही तर तिचा उपयोग देशातील उत्पादन घटकाचे मोबदले ठरवितानासुध्दा होत असतो. उदा. देशातील कामगारांना असलेली मागणी जर लवचिक असेल तर कामगार संघटना आपल्या कामगारांच्या वेतनात वाढ करून घेण्यात अयशस्वी ठरतात. याउलट हीच मागणी अलवचिक असेल तर मात्र त्या सहज यशस्वी होतात. हीच बाब इतर सर्व उत्पादन घटकांच्या मोबदल्यांच्या संदर्भात लागू पडते.

(४) **राजकोषीय सिध्दान्तातील महत्त्व :** सरकारला क.विषयक धोरण ठरविता मागणीच्या लवचिकतेचा उपयोग होतो. कर हा व्यक्तीला त्याच्या उत्पन्नातून द्यावा लाग त्यामुळे ते करदात्याला ओझे वाटते. त्यासाठी कराचे ओझे विशिष्ट व्यक्तीवर किंवा गटावर लादता ते सर्वांत सारख्या प्रमाणात कसे विभागून देता येईल याचा विचार झाला पाहिजे शिवाय सरकारलासुद्धा कोणत्या वस्तूवर कर लादला असता त्या वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचा परिणाम त्या वस्तूच्या मागणीवर किती होईल व त्यातून सरकारच्या तिजोरीत कित उत्पन्नाची भर पडेल हे लक्षात आले पाहिजे आणि हे सर्व समजण्यासाठी मागणीची लवचिकता समजणे अत्यंत आवश्यक असते.

(५) **आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दान्तातील महत्त्व :** सरकार आपला व्यवहार शेष संतुलित ठेवण्यासाठी काही वस्तूंची आयात करते तर काही वस्तूंची निर्यात करते. वस्तूच्या आयात-निर्यातीमधून सरकारला परकीय चलन उपलब्ध होते. तेव्हा परदेशात कोणत्या वस्तूला मागणी आहे व त्या वस्तूची त्या देशातील मागणीची लवचिकता काय आहे याचा विचार करून त्या वस्तूंच्या किंमती ठरविल्या जातात. निर्यात करीत असलेल्या वस्तूची मागणी अलवचिक असेल तर त्या वस्तूला अधिक किंमत आकारली जाते व मागणी लवचिक असेल तर किंमत कमी आकारावी लागते.


Thank you